| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ<br>अमरावती विभागीय मंडळ अमरावती.<br>MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION<br>AMRAVATI DIVISIONAL BOARD, AMRAVATI.444 602. | |

पत्र क्र.अविमं/ परिक्षा-५/1008
दिनांकः-३१/०७/२०२५

प्रति,

मा.उपसंचालक,

माहिती व जनसंपर्क कार्यालय,

अमरावती विभाग,अमरावती

**विषयः** उच्च् माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेल्या सवलतीबाबत

**संदर्भः** पत्र क्रमांकःरा.मं./ परिक्षा-५/२७१७, दिनांक ३०/०७/२०२५ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते, की,ऑटिस्टिक या प्रकारातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवलती संदर्भात दि.३०/०७/२०२५ रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने प्रकटन सोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.

(एन.एम.साखरकर)
विभागीय सचिवांकरीता
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्रः** प्रकटनाची प्रत.

**प्रतिलिपीः**

१)मा.सचिव, राज्य मंडळ, पुणे

२)विभागीय शिक्षण उपसंचालक,अमरावती यांना माहितीस्तव.

३)शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.अकोला/अमरावती/बुलढाणा/यवतमाळ/वाशीम यांना माहितीस्तव.

४)मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त शाळा अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

**विषयः–उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेल्या सवलतीबाबत**

## ! प्रकटन !

ऑटिस्टिक (स्वमग्न) या प्रकारातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवलतीसंदर्भात दिनांक ३०/०७/२०२५ रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती खालीलप्रमाणे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षांसाठी प्रविष्ट होणाऱ्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार शासन निर्णय क्र.संकिर्ण–२०१७/(११८/१७)/एसडी–६, दि. १६ ऑक्टोंबर २०१८ नुसार विविध सवलती मंडळाकडून दिल्या जातात.

केंद्र शासनाने दिव्यांग विद्यार्थ्यांसंदर्भात स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) निश्चित केलेले असून एखादया विद्यार्थ्याकडे जर दिव्यांग प्रमाणपत्राऐवजी असे स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) असेल व त्यांनी सदर प्रमाणपत्र विभागीय मंडळ कार्यालयास दिव्यांग प्रस्तावासोबत सादर केलेले असल्यास विविध सवलतीकरीता अशा विद्यार्थ्यांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon) यांची प्रतिस्वाक्षरी असलेले विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्राची मागणी करू नये असे क्र.रा.मं./परीक्षा–५/५१४५ दि. २३/११/२०२३ च्या पत्रान्वये सर्व विभागीय मंडळांना कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांना मंडळाकडून नियमानुसार विविध सवलती दिल्या जातात.

उपरोक्तप्रमाणे सन २०२३–२४ पासून कार्यवाही करण्यात येत असून निर्धारित सुविधेपासून कोणताही दिव्यांग विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता मंडळाकडून घेण्यात आलेली आहे. जरी एखाद्या विद्यार्थ्याकडे स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) नसले तरी त्याच्याकडे विहीत नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र असेल तर अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना मंडळाकडून नियमानुसार विविध सवलती देण्याबाबतची कार्यवाही मंडळाकडून केली जाते.

त्यामुळे याबाबत संबंधित प्राचार्य, मुख्याध्यापक, पालक व विद्यार्थी यांनी संभ्रम बाळगू नये.

**दिनांक:-३०/०७/२०२५**

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.